
चंद्रकोर
वसंत बागुल

# चंद्रकोर

वसंत बागुल

ई साहित्य प्रतिष्ठान

# चंद्रकोर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चंद्रकोर (कवितासंग्रह)

कवी : वसंत बागुल

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट

स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १० जून २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री वसंत बागुल : एक कलंदर लेखक



वसंत बागुल एक मालेगावच्या शाळेतले शिक्षक. पण या सामान्य शिक्षकाने असामान्य काम केले.MA नंतर PhD ला हेन्रिक इब्सेन च्या नाटकांचा अभ्यास करायचा म्हणून ते थेट नॉर्वेजिअन भाषा शिकायला नॉर्वेमध्ये पोचले. नोकरी धंदा सोडून. तिथे राहून, पडतील ती अंगमेहनतीची हलकीसलकी कामं करून तिथली भाषा शिकून त्यांनी इब्सेनच्या मूळ पुस्तकांवरून मराठी अनुवाद केले. आणि आपलं PhD पूर्ण केलं. मग गेले जपानमध्ये तिथल्या साहित्याचा अभ्यास करायला. नंतर न्युयॉर्क (अमेरिका), बर्मिंगहॅम-लंदन-इंग्लंड- फ़्रँकफ़ुर्ट (जर्मनी) अशी दुनिया फ़िरून तिथल्या भाषा शिकून त्यांनी डझनभर पुस्तकांचे (नॉर्वेजियन, इंग्लिश, अमेरिकन, जपानी) अनुवाद केले. शिवाय हिंदीतल्या हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशालाचा मराठीत छंदानुवाद केला आहे. या शिवाय त्यांची स्वतः लिहीलेली नाटके , एकांकिका, लेख, कविता आहेतच. प्रकाशझोतापासून दूर राहिलेला हा एक मनस्वी कलंदर लेखक. त्यांची डझनभर पुस्तकं आता एक एक करून ई साहित्य मधून वाचकांकडे येतीलच.

वाचकांच्या अभिप्रायांची ते वाट पहात आहेत.

त्यांचा पत्ता
वसंत बागुल, ३०२, न्यु शिवम अपार्टमेंट, स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे
फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

# चंद्रकोर

-वसंत बागुल

# अनुक्रमणिका

**भक्तीगीते--**

१) जय गिरिजात्मक
२) हे सरस्वती
३) असावे सदा मुखी तव नाम
४) हनुमंताची मधुर वाणी
५) देवा काय मागू मी तुला
६) वदली विदेह नंदिनी
७) वदे विठ्ठला रूक्मिणी
८) माझ्या अंगणात आहे तुळशी वृंदावन
९) असता देव्हाऱ्यात माझ्या

**कविता व भावगीते—**

१०) चंद्रकोर
११) रूपवती
१२) तरी उभी का दूर?
१३) सूर्य
१४) लेणे
१५) ज्योती
१६) आशा
१७) तुझी आठवण
१८) काय दोष तुझा त्यात?
१९) कल्पना
२०) शान
२१) मन माझे बावरले
२२) दुपार
२३) फुलपंखी
२४) घास
२५) शर्वरी
२६) रथ
२७) सोनियाचा क्षण
२८) इंद्रधनु
२९) तराणे
३०) वाट
३१) तयाला प्रेम असे हे नाव
३२) भेट
३३) आषाढाची घुमे पावरी
५०) स्वप्न
५१) वसुंधरेच्या वीणेवरती

३४) स्वप्ने भंगून गेली
३५) भाता तुझ्या कटीला
३६) अजून...
३७) मी कसा?
३८) असतेस जेधवा तू...
३९) सार जरा बाजूस हा...
४०) आमुची शाळा
४१) आज आकाशी
४२) खिन्नता
४३) जीवन
४४) अपराध
४५) आकाशातील
४६) तू येशील का?
४७) जोवरी
४८) नभातल्या निळाईची
४९) रात जळे
५२) मन मानेना
५३) आज कसे
५४) अर्थ
५५) पिसारा
५६) चैत्राचा महिना आला
५७) ऊन सावली
५८) ससा
५९) दुःख माझे
६०) जला रे
६१) भास्करा
६२) I wandered…
६३) मी विहरत होतो...
६४) प्रदीर्घ कुंभक
६५) जा रे जा रे पावसा
६६) आली खिडकीत माझ्या
६७) चल आपण होऊ

## जय गिरिजात्मक

जय गिरिजात्मक सिद्धी विनायक जय जय मयुरेश्वरा ।।
बल्लाळेश्वर वरद विनायक जय जय विघ्नेश्वरा ।।
जय चिंतामणी जय रांजणच्या महागणपती सर्वेश्वरा ।।१।।

अष्टविनायक म्हणूनी नांदशी मऱ्हाटीच्या नगरी ।।
पावन करीशी मंगल करीशी नटनाट्य कलाकुसरी ।।
वंदन करितो आधी तुजला शिवपार्वती कुमरा ।।२।।

लखलखतो मुक्तहार अंगावर केशरीया ।।
शोभविती रत्नमणी किरिट कंकणी घागरिया ।।
तेजःपुंज रूप तुझे ते दाखवी या पामरा ।।३।।

फरश करी दुष्टनाश कमल करी संजीवना ।।
सत्व पाही करी अंकुश करी मोदक मधुरमना ।।
विद्या धन संपदासी आशिष द्या करूणाकरा! ।।४।।

## हे सरस्वती

हे सरस्वती हे भगवती हे विश्वमोहिनी
नमन तुला शारदा हे वाग्विलासिनी ।।धृ।।

वेदपुराण माला अन्
ब्रम्हमय वीणावादन
श्वेत हंसी तव विहार दश दिशातूनी ।।१।।

शुभ्रांबर वसन तुझे
श्वेत कमल आसन तुझे
अलंकार विभूषित तनु मंगल तेजस्विनी ।।२।।

संत, कवी, ॠषी मुनिजन
सर्वा मुखी तव नर्तन
विद्याही तूच, ऐश्वर्यही तूच संजीवनी ।।३।।

## असावे सदा मुखी तव नाम

सुखदुःखातही तुला न विसरो मन माझे श्रीराम
असावे सदा मुखी तव नाम ।।धृ।।

चळो न बुद्धी संकटातही
असो नाव मग वादळातही
कितीही असला कठीण भयंकर हा जीवन संग्राम ।।१।।

लाभो दौलत किर्ती शक्ती
परि न विसरो मन तव भक्ती
तूच दाता आणिक घेता मनी नसो अभिमान ।।२।।

वाल्याला रामायण स्फुरले
तव नामाने पत्थर तरले
खारी सम तव सेवा होऊनि मिळावया वरदान ।।३।।
असावे सदा मुखी तव नाम

## हनुमंताची मधुर वाणी

हनुमंताची मधुर वाणी
सांगे सीतेला रामाची कहाणी ।।धृ।।

इक्ष्वाकु वंशात चक्रवर्तीच्या कुली
पुण्यशील दशरथ नृपती गेला होवोनी
तपस्येत ऋषीतुल्य इंद्रासम बलवान
दयाळू पराक्रमी अशी ख्याती त्याची जनीमनी ।।१।।

पुत्र तयाचा राम लाडका चंद्रासम अनुपम
निपुण शस्त्र विद्येत धनुर्धर धर्माच्या रक्षणी
सत्य प्रतिज्ञ वृद्ध पित्याची आज्ञा होता त्याशी
बंधु लक्ष्मण, पत्नी सीतेसह फिरला रानोवनी ।।२।।

बहु मायावी दैत्यांचा वध रामाने
खर दुषणासम दुष्ट राक्षसा पाठविले यमसदनी
कृत्य तयाचे कळता त्याचे जाहला क्रोधाविष्ट रावण
मृगरूपाने मरीच पाठवून कपटाने पळविली जनकनंदिनी ।।३।।

सीतेला शोधीत रामलक्ष्मण मतंग वनी आले
सुग्रीवासी स्नेह करून वालीचा वध करूनी
सहस्त्र वानरे निघाली सीतेच्या शोधार्थ
संपातीने सांगता आलो समुद्र मी लंघुनी ।।४।।

रघुनाथाच्या मुखातून मी ऐकले जानकीचे रूप
तशीच लक्षणे आणि रंगरूप दृष्टीस माझ्या पडूनी
विशाल लोचन वैदेहीच्या शोधार्थ कपी हा आला
इतुके बोलून गप्प जाहला वानरशिरोमणी ।।५।।

## देवा काय मागू मी तुला?

देवा काय मागू मी तुला?

सर्वस्व दिले तू मला ।।धृ।।

काया दिधली वाचा दिधली

दिधले मन तू मला ।।१।।

काया शिणू दे परोपकारी

वाचा अर्पू दे तुझिया भजनाला ।।२।।

अद्‌भुत दुनिया नयना दाविली

सुखाच्या राशी दिल्या जीवनाला ।।३।।

शक्ती दिधली बुद्धी दिधली

संकटातही वेळोवेळी धैर्य दिले तू मला ।।४।।

देवा काय मागू मी तुला

# वदली विदेह नंदिनी

कपिवरा रे घेऊनि जा रे देते हा दिव्य चुडामणि
दे संदेश माझा श्री रामाला वदली विदेह नंदिनी ।।धृ।।
होईल स्मरण माझे, मम मातेचे, तुमच्या पिताश्रींचे
हा  दिव्य चुडामणि अवलोकुनी ।।१।।

निरोप घेता सीतेच्या चरणावरती मस्तक ठेवुनी
कर सहाय्य कपिवरा मला सोडविण्याला बंदीवासातुनी
गहिवरली ती आले तिचे नयन अश्रूंनी भरूनी ।।२।।

कुशल कथावे श्री रामासह सर्वांना तारा मला दुःख समुद्रातुनी
जगवावी ईर्षा मज सोडविण्याची त्यांच्या मनी ही कहाणी ऐकवुनी
वदली सद्गद होऊन करीत विनवणी ।।३।।

सीतेचे ते बोल ऐकता पवनकुमार वदला शिरावर अंजली जोडुनी
वानरसेनेसह सत्वर येतील श्रीराम आणि नेतील तुला जिंकूनी
होईल मीलन तव श्री रामचंद्राशी जशी चंद्र आणि रोहिणी ।।४।।

## वदे विठ्ठला रूक्मिणी

पहाटेस घालतसे कुणी तुळशीस पाणी
द्या हो दर्शन आता वदे विठ्ठला रूक्मिणी ।।धृ।।

आणिल्या कुणी तुळशीच्या माळा
कुणी लाविण्या आतुर केशर कस्तुरीचा टिळा
घेऊनी औक्षणाची ताटे उभ्या साऱ्या सुवासिनी ।।१।।

ऐकताचि हाक गरूड ठाकला सत्वर
आले विठ्ठल रूक्मिणी बैसूनिया पाठीवर
तव नामाच्या गजरी गेला आसमंत भरूनि ।।२।।

पाहे पुंडलिक वाट, कर निढळयाचे वरी
ठेवा कटीवर हात उभे रहा विटेवरी
फिटणारे पारणे डोळयांचे न्याहाळिता चक्रपाणि ।।३।।

## माझ्या अंगणात आहे तुळशी वृंदावन

माझ्या अंगणात आहे तुळशी वृंदावन
प्रतिदिनी प्रातःकाळी घडे मला दर्शन ।।धृ।।

घालते मी तुळशीस पाणी उषःकाळी
वृंदावनातली मृत्तिका लाविते मी भाळी
बघते मी त्यात नित्य लक्ष्मी रमण ।।१।।

सभोवती सडा रांगोळी घालून
करिते मी पूजा तिची दीप घृताचा लावून
जिच्या शाखी वसे ब्रम्हा पर्णोपर्णी देवगण ।।२।।

समस्त तीर्थक्षेत्रे तिच्या चरणाशी
गंगा भागीरथी वाहतसे तिच्या मुळापाशी
तुळशीची माळा गळा असे विठ्ठलाचे ध्यान ।।३।।

## असता देव्हाऱ्यात माझ्या लक्ष्मी नारायण

असता देव्हाऱ्यात माझ्या लक्ष्मी नारायण
मी कशाला करू सकल तीर्थाटन ।।धृ।।

देव्हारी असता शिवतनय गजानन
क्षेत्र अष्टविनायक जायचे न प्रयोजन
सकल सुरांआधी करितो मी तयाला नमन ।।१।।

राम दरबार असता माझ्या घरी
कशाला जावू मी अयोध्या नगरी
नको अमरनाथ काशी मम हृदयी शिवाचे स्थान ।।२।।

नको जावया द्वारका, मथुरा, पंढरपुरा
राधा मोहन वास करी माझिया घरा
विठ्ठल रूक्मिणी देव्हारी, दारी तुळशी वृंदावन ।।३।।

जावूनी देहू आळंदीला काय म्हणून मी नाचू
गाथा तुकयाची, गीता ज्ञानेशाची जर घरीच मी वाचू
समर्थ स्वामी, साईबाबा देती नित्य स्वप्नी दर्शन ।।४।।

मच्छिंद्र गोरखांचा असता कर शिरी
कशास जावू मी तोरणमाळ गिरीकंदरी
देवघरात चाले महाभारत रामायणाचे पारायण ।।५।।

## चंद्रकोर

हळू हळू चंद्र कोर
नाही कळे कशी फुले
केशरात भिजलेला
चंद्र कसा मनी झुले

हळूहळू ठिबकून
बिंब गळे कले कले
आणि कळू आले मला
चंद्रकोर कशी फुले.

## रूपवती

रंग फिका मखमली केतकी
अधर कळी कर्दळी
छटा जराशी तांबूस गाली
वरी लाजरी खळी

निळा पिसारा खुलता वरती
मंद चमकली रेती
अन् पाचूंच्या लाटांवरूनी
आली रूपवती

क्षणात हसूनी क्षणात गाऊनी
गेली मंजूळ गान
आणिक उरलो मंत्रमुग्ध मी
वैशाखाचे दान!

## तरी उभी का तू दूर?

झिरझिरणारा रंग गुलाबी
चमचम चंदेरी पदर
सावरून बोटात कन्हेरी
अशी उभी का तू दूर?

भुरभुरणारी बटमोगरी
खुणाविते वर हळुवार
आणि संभ्रमित सीमेवरती
अशी उभी का तू दूर?

भिरभिरणारी तृषित पाखरे
उत्सुक मानस सरोवर
मलूल मेहंदीत अडवून त्यांना
अशी उभी का तू दूर?

लाल गुलाली संध्या प्राची
वाटही विरली क्षितीजावर
आणिक आलीस किती युगांनी
तरी उभी का तू दूर?

# सूर्य

माझे अंगाराचे मन जणू तळपतो सूर्य
वारा घालीते आकाश अंगी पांघरूनी धैर्य
या सूर्याच्या भोवती धरतात स्मृती फेर
आणि भासतात त्याही जणू ग्रहगोल दूरवर
धागे बांधुनिया किती आहे जोडले अंतर
ते तोडून सोडून कसे जातील ते दूर?
मनी दाटली जरी खोल एक हुरहुर
कसा जाऊ मी जवळी माझे ठिणग्यांचे कर
ही व्यथेची दुधारी घुसे मनी आरपार
ज्वाला उफाळती दूर आत पेटूनी निखार!

## लेणे

विरहनलातील विकल मनावर
कल्पद्रुमांची निळसर पाने
दग्धकाजळी निशेवरती
आकाश उलूनी झरे चांदणे
बिंबही आपुले अंतर फोडूनि
ठिबकूनि सलत्या जलास रंगे
कंटक रूतल्या कलिका फुलूनी
धुंद गंध वाऱ्यात तरंगे
मिटत्या धूसर क्षितिजा ओठी
खुलले लवलव तांबूस गाणे
अजून का मग (पाषाणाचे?)
अबोल माझे सुंदर लेणे?

## ज्योती

लावियल्या नयन ज्योती

अश्रूंचे ओतूनि तेल

शहारती बावरती

निःश्वास टाकीता खोल

कधी स्थिरेल का दृष्टी

तुज कळेल का कधी मोल

पाहण्या अंतरी सृष्टी

ताऱ्यांचे तेज सलील

ती सृष्टी पाहून पाहून

स्वरकल्पांचा घेऊन

गाऊन कोकिळा थकली

ते सुख सारे साहून

**आशा**

फुलाफळांची आशा होती

कुणास नसते?

माहित नव्हते स्वप्न असे हे

मृगजळ असते

प्रीत केली मी क्षितिज लंघून

कोण न करतो?

शाप मला हा माहित नव्हता

जो तो हरतो

पाण्यामधल्या शशीबिंबाला

धरता हाती

हातामध्ये आले पाणी

आणिक माती

## तुझी आठवण

किती मधुर मधुर
प्रिये तुझी आठवण
येता नवरसी बुडे
माझे तन आणि मन
सखी तुझी आठवण
पाजळली तलवार
येते कापीत या माझ्या
मनास गे अलवार
तुझी आठवण प्रिये
जशी पावसाची सर
बुडवुनी टाकते गं
माझे चिमुकले घर
इंद्रधनुसारखी गं
सखी तुझी आठवण
विरहाच्या काळ्या मेघी
येते हृदयी खुलून

## काय दोष तुझा त्यात?

काय दोष तुझा त्यात सदा राहते धुंदीत
आहे मुळी चंदनाची प्रीत माझी सुगंधीत

काय दोष तुझा त्यात जाते हरखुनी भान
प्रेमातच माझ्या मुळी आहे तसलीच शान

काय दोष तुझा त्यात पाहताच फुले कळी
चांदण्याची प्रीत माझी आणी सागरा उसळी

काय दोष तुझा त्यात माझे हरवते मन
आहे मुळी ओथंबले हृदयात तुझे प्रेम

काय दोष दुनियेचा होई जळुनिया खाक
आहे मुळी भरलेले तिच्या नजरेत पाप

## **कल्पना**

ह्या माझ्या लोचनांनी

आसवांचे दान दिले

आणि माझ्या ह्या हातांनी

पुसण्याचे भान दिले

कानांनी ह्याच माझ्या

कडकडाट ऐकविले

पण माझ्या पावलांनी

नेहमी पुढेच नेले

क्षितिज पुढे दावूनिया

बुद्धीने मज थांबविले

पण माझ्या कल्पनेने

पलीकडचे दाखविले.

## शान

मला काय होते हवे

ह्याची होती तुला जाण

तुझी नभाची ओंजळ

अडली द्याया फुल पान

सागराच्या किनाऱ्याशी

झाली व्याकूळ तहान

लाटांनीच अथांगशा

दिले आसवांचे दान

चांदव्याच्या चांदण्यात

येता प्रितीस उधाण

फेकला तू पेटलेला

मला जाळण्यास बाण

नाही दिले कसे म्हणू

घेतो दिलेल्याची आण

त्याच ज्वाला आसवांची

आज मिरवितो शान

## मन माझे बावरले

मनी चांदणे, ओठामधुनी
गीत मधुर फुलले
लाख लपविता भाव प्रीतीचे
आज तुला हे कळले

मनात नव्हते कधीच माझ्या
फुलवायाची फुले
तरी अचानक आज कसे हे
मुग्धगंध दरवळले

जरी साहण्याजोगे नसतील
अपराध मी केले
हृदयी धरशील का तू विसरून
मन माझे बावरले.

# दुपार

तप्त धुळीवर यावी जशी पावसाची सर
भर दुपारी तू तसे माझे गाठले गं घर
क्षणभर तू दारात करता पदराशी चाळा
तापलेल्या मनावर गार झुळला गं वारा
‘येना!’ म्हणता येऊनि तुझे धुंद गं पाहणे
भर दुपारी फुलले माझ्या मनात चांदणे
औपचारिक बोलून घेता हातात मी हात
त्यास ओथंबिले गं तू तुझ्या ऊष्ण आसवांत
तुझ्या हुंदक्यांचे अर्थ जेव्हा मला गं कळले
किती किती माझे गं हे उर भरूनिया आले
झाल्या जेव्हा तिन्ही सांजा, गेली लोटूनिया दार
माझ्या मनात पेटली रणरणती दुपार!

## फुलपंखी...

फुलपंखी ओठाआड तुझे मोतियाचे दात
चमकता, उजळते माझ्या मनातील वात
फुलाफुलांच्या साडीत किती दिसते नाजूक
भृंगाचे हे मन माझे कधी करील ना चूक!

ठीक नाही वेळावून असे तुझे हे पाहणे
रोखलेल्या नजरांना जड जाईल साहणे
जेव्हा दिसतो मला ना तुझ्या गालावर राग
हृदयात कुठेतरी लागे चंदनास आग

तू, मी नाही फुलविली कधी शब्दांची ही फुले
भासे दूर नाही वेळ हृदयास होण्या खुले

**घास**

जर्द पिवळ्या दुपारी
निळे आकाश बेजार
काळा ठिपका बनून
वर हिंडतसे घार

सावलीत थांबलेली
गाय करते रवंथ
बांधलेल्या वासराची
तिच्या मनी दाटे खंत

बाभळाच्या झाडाखाली
लेकरास निजवून
आई वेचितसे भात
कापलेल्या शेतातून

घास मुखी भरविण्या
चाले उन्हावर मात
कापलेल्या शेतामध्ये
सावलीत, आकाशात

## शर्वरी

चांदव्याचा मांडूनिया
        क्षितिजावर आईना
शर्वरीने केला सुरू
        साज, मन हे साहिना
न्हाऊनही चांदण्यात
        दिसे सावळीच रात
होते तुझ्याच रूपात
        चांदण्यांची बरसात
गर्द राईतुनी जेव्हा
        जर्द काजळी ती ल्याली
मोरपंखी नयनांची
        तुझ्या आठवण झाली

**रथ**

रथ येऊ दे सोनेरी, केशरी या नभातून
सृष्टी स्वागतास उभी मोती दवांचे घेऊन
रथ येऊ दे रे तुझा बहरला पारिजात
वाट तुझीच पाहतो करावया बरसात
बुडूनिया अंधारात झाले काळे काळे जळ
केव्हा उजळते पहा तुझी मंद सोनसळ
उभे ठाकले पर्वत रथ येऊ दे रे तुझा
ओंजळीत त्यांच्या आहे झाली उत्सुक शैलजा
वात सारून सारून गेले जळूनिया तेल
ये रे लवकर आता जाऊ पाहतसे तोल

## सोनियाचा क्षण

तुझ्या मुठीमध्ये आहे
आता सोनियाचा क्षण
नको खंत गेलेल्याची
आता येणाऱ्याची आण

याच क्षणी घाल घाव
नको दवडू रे शक्ती
बांधण्यास मंदिराला
हवी यत्नांचीच भक्ती

पण लाव सारे बळ
पाषाण हे फोडण्यास
उद्या ह्याच मंदिराचा
तू रे होणार कळस!

## इंद्रधनु

जेव्हा खुले इंद्रधनु काळया काळया मेघासवे
हट्टी माझे मन म्हणे रंग हवे तेच नवे
फुलपाखरांचे पंख विकसती फुलांसवे
छंदी माझे मन म्हणे पंख हवे तेच नवे
जेव्हा उमलूनी फुले गंध जाई वाऱ्यासवे
धुंद माझठे मन म्हणे गंध हवे तेच नवे
निळया निळया आकाशात जाती बगळयांचे थवे
स्वच्छंदी हे मन म्हणे छंद हवे तेच नवे
सृष्टी रोज फुलतसे घेऊनिया रूप नवे
अरे माझ्या वेड्या मना तुला काय काय हवे!

## तराणे

जगास जर त्या कळले नाही

आपुले नाते

अतूटतेची ग्वाही देतील

रंग नभाचे!

जर्द काजळी पाषाणांची

पुटे जयावर

उमलणार ती कधीच नाही

फुले तयावर

आणिक जर तू पुजा आरंभिली

भावफुलांनी

तुझ्या फुलांची मातीच होईल

त्याच शूलांनी

म्हणून म्हटले काहीबाही

अशा जगाने

पर्वा नाही, गाऊ आपण

हेच तराणे!

## वाट

पाहून पाहून वाट किती हे
अंतर मम होई वेडे
दाटदाटूनी तव स्मृतीचे
निळे चांदणे मनास वेढे
धूसर धूसर गीत गाऊनी
लहर सावळी जाते
कवेत मिटल्या कळया फुलांवर
ठेवूनि गार उसासे
हुं हू हुं हू करूनी पारवा
शांत धुक्याला फसवितसे
चाहूल लागून पुसट तुझी अन्
बावरलेले मन जळते

## तयाला प्रेम असे हे नाव

जिथे न लागे दोन मनांचा कधी कुणाला ठाव
तयाला प्रेम असे हे नाव

भावबंधनांची ही नाती
जिथे युगांची क्षणात जुळती
जन्मजन्मांतरी न तुटती पडोत कितीही घाव!

इथे राव ना रंक कुणीही
रूपगर्विता असो गुणीही
फुले कंटके सर्वा हाती कुणा भेद ना भाव!

इथे ना लिपी इथे न भाषा
पुरे स्मिताची पुसट रेषा
जीवन पणाला लावून द्यावे असाच सुंदर डाव!

**भेट**

कोणी दिला हार

कोणी दिले तुरे

कोणी माणिक मोती

कोणी दिले हिरे

सोनियाच्या महाली

दीप झुंबर फिरे

मी तर कफल्लक

काय देऊ बरे?

लावण्य खाणीवर

ऐश्वर्य झरे!

* * * * *

देतो एक भेट

त्यजून सारे

हरवू नको मम

अंतरीचे तारे!

# आषाढाची घुमे पावरी

आषाढाची घुमे पावरी हिरव्या तालावर
निळे उतरले मोर सावळया डोंगरमाथ्यावर

गाभूळलेल्या नभी गर्दशा
डंख मारीता वीज सारखा
नवरसधारा झरू लागल्या काळया धरतीवर

ज्वालेमध्ये जणू आहुती
पडता मृद्गंध पसरे वरती
वरूणराज का यज्ञ आरंभी समृद्धी खातर?

श्रवे रूपेरी धन मातीवर
रंग चंदनी ल्याले जलधर
कुबेरची का अलका उतरे या भूवर या भूवर?

## स्वप्ने भंगून गेली...

स्वप्ने भंगून गेली

ज्यात मनोरे संगमरवरी, नक्षत्रांच्या वेली!

ज्यात रेखिल्या प्रेमभावना

ज्यात कोरल्या मनोकामना

अनुपम लेणी रंगविताना

मातीस मिळूनी गेली!

ज्या मंदिरी सूर गवसले

जीवनाचे संगीत विलसले

पाहून त्यांना प्राक्तन हसले

विराण जागा केली!

या अंधारी विराण जागी

मीच एकटा फिरे अभागी

प्राणज्योत ही तरीही जागी

जरी आशा विझलेली!

## भाता तुझ्या कटीला!

पुष्पाहूनी म्हणावे का मी तुला मृदुला
हृदयांतरी तुझ्या गे असता कठोर शिला

नवरंग श्रावणाचे कुंतली निथळले
ज्वाला तिथे उसळल्या अन् हे मोहोर जळले
जीवन जिथे करपले आशा मिळे धुळीला

भाषा जिथे कळाली शब्दाविना प्रीतीची
नजरेत बेईमानी दिसली सुलोचनेची
ते शल्य आत रुतूनी नयनास पूर आला

का कोवळया मनाच्या माझ्याच जीवलगे तू
केली शिकार माझी निष्ठुर निर्दये तू
हृदयात बाण माझ्या भाता तुझ्या कटीला!

# अजून...

अजून पाहता दंवात न्हात्या चाफेकळीचे रूप
मनात माझ्या फूल उमलते तव आठवणींचे नित

अजून लवत्या गर्द डहाळी निळया जलावर भरती रंग
संथ उमलती त्यात अनंत तव भेटीचे मंद तरंग

अजून तीरावर अवखळ वारा धरूनी रेतीचा हिरवा छंद
हळूच जाई लतिका मधूनि नेत बकुळीचा गंध

अजून खुलत्या क्षितिजावरती अडखळते संध्येचे पाऊल
नभात धूसर निळया अंतरी सलील रूपेरी लागून चाहूल

अजून धरेच्या वीणेवरती तारा हलती आकाशातील
स्वरात मिळता गीत तुझे ते अजून ऐकतो आसमंतातील

## मी कसा ?

मी कसा?

विचार त्या रूंद पिंपळ वृक्षाला-

पानांचे हिरवे दात विचकावीत

आणि बदामी लाल डोळे मिचकावीत

हसत सांगतील...

फोफावलेल्या शाखा

दाखवितील माझ्या जीवनाच्या दिशा

घारीचं लक्ष वेधणारा शेंडा

दाखविल आशेची पिसे....

तू हसशील उपहासाने... पण-

एक मात्र ध्यानी धर

खोल खोल गेलेल्या वाकडया मुळयांना

नको विचारूस माझी कहाणी

कारण...

मी अश्रूंनीच त्यांना वाढविले आहे.

**असतेस जेधवा तू...**

चिंता मला ही ग्रासे बोचून काळजास
असतेस जेधवा प्रिये माझ्या तून उदास

घेऊ का वेदनेचे काटे करूनी गोळा
अन् प्रीतीच्या फुलांच्या घालू करूनी माळा
मुखचंद्र पाहूनी ये व्याकुळता जीवास

अवचित का गं आले डोळे तुझे भरूनी
फूल पावसात माझे गेले जसे सुकूनी
वनास जशी लागे तशी लागे आग मनास

## सार जरा बाजूस हा...

सार जरा बाजूस हा

        पदराचा शामियाना

नुकताच उगवला

        चांद मला पाहू दे ना

निळया निळया नयनांची

        कमले ही उमलू दे

अधीर या मनाची गं

        धुंदी जरा उसळू दे

ओठांवर खुलू दे ना

        गुलाबास मंद मंद

भृंग होई अधीर ना

        पिण्यास तो मकरंद

## आमुची शाळा

गावातल्या वेशीपाशी आमुची ही शाळा छान
सदा बहरूनी राही सभोवती हिरवे रान
गच्च हिरवे काटेरी निवडुंग डवरले
त्यावरच उमलती रोज चिखाळीची फुले
मंदिराच्या बाजूस त्या रोज प्रार्थना ही होई
आहे सर्वांसही खुली ज्ञानामृत पाणपोई
होता सुरू मग शाळा कुठे रमते विज्ञान
कुठे कविता सुंदर कुठे गणिताचे पान
घडतील वाटे मला अनघड या मोत्यांचे
कुणी कवी कुणी ज्ञानी कुणी शास्त्रज्ञ उद्याचे!

## आज आकाशी

आज आकाशी धुंद चांदणे पवन घुमे सुरात
मंद मंद पाऊले टाकूनी आली मधुमय रात

चंद्र कलश हा शिरी पाहूनी
मोहरले यमुनेचे पाणी
निळया निळया या लाटांवरती आज कशी ही बरसात

नयनातले काजळ ओले
दूर मुरलीचे सूरही गेले
वाट पाहूनी थकली राधा कलश बुडे जलात

## खिन्नता

आली खिन्नता मनास
        कोठे जावे ते कळेना
वाटे उदास उदास
        कोठे पाऊल वळेना
स्थिर दृष्टी एकेठायी
        नाही मना कुठे ठाव
दूर दूर स्वप्नातले
        गेले हरवून गाव
नको नको त्याच स्मृती
        आल्या पंख पसरून
झाली किलबिल आत
        पान पान थरारून
रातभर उरातच
        तांडा राहणार आता
आणि ओसाड होईल
        सारे निघूनिया जाता

# जीवन

जीवन असावे सुंदर सुंदर कळीसारखे मुग्ध मनोहर
दवबिंदूंच्या स्पर्शाने ते फुलत रहावे असे निरंतर
फुलपाखरापरी असावे जीवन अपुले असेच चंचल
जग हे उपवन येथे विहरून मधु चाखावा फुलाफुलातील
हिमालयासम भव्य असावे कांती असावी आरसपानी
हृदयामध्ये असून कातळ गंगेचे स्त्रवते ज्यातून पाणी
जीवन म्हणजे अथांग सागर, त्यात असावी भरती ओहोटी
आणि तुफानी लाटांखाली असावेत ते सुंदर मोती
जीवन म्हणजे अंबर निळे त्यात असाव्या मेघमालिका
ढगाआडूनी चंद्र दिसावा कुठे दिसावी मुग्ध तारका
जीवनी असाव्या श्रावणधारा वादळ व्हावे कधी भयंकर
आणिक होऊनी शांत खुलावे इंद्रधनुने त्याच्या नंतर
पूर्वछटेसम जीवन फुलावे तिन्हीसांजांचा भाव खुलावा
अन अस्ताच्या सूर्यासम तो जीवनी पूर्णविराम असावा!

# अपराध

दिसे तळे शांत शांत वाहे मंद मंद वारा
पर्वतांच्या पलीकडे विझू लागला निखारा

दिसे धग अजूनही पश्चिमेच्या मेघावर
आली चांदणे शिंपीत चंद्रकोर सृष्टीवर

एकटा मी काठावर खडा फेकता जळात
झाले सारे विचलित येता वलये पळात

अंगअंग विस्कटून तळे लागले ते जळू
केलेला मी अपराध तेव्हा आला मज कळू

**आकाशातील...**

आकाशातील प्राजक्ताची फुले लागता गळू
तव स्मृतींच्या झोक्यावरती मन लागले हिंदळू

सळसळ येता पहाटवारा
गोड गुलाबी उठे शहारा
धुंद मुलायम स्वप्नांमध्ये ओढूनी घेशी हळू

मेंदी भरल्या हाता धरूनी
घननिळाच्या पंखांवरूनी
हळूच बसवून मजला नेशी शुक्र लागता ढळू

उतरताच त्या चंद्र महाली
कमलफुलांनी स्पर्शून गाली
तव अधरांची मधुर कुजबूज येते मजला कळू

# तू येशील का?

अफाट..... दूर.....

खवळत्या सागरातून वल्हवीत...

चिंब पापण्या घेऊन....

वादळाशी झुंजलेले, वर्षेत विखरलेले...

ओथंबलेले काजळी कुंतल घेऊन...

फुलणाऱ्या श्वासांनी, कन्हेरी बोटांनी

ढळते वस्त्र सावरीत वीजेचे पैंजण बांधून...

पिंजलेल्या काळया थव्यातून जपून येताना

दंव गोठले मिटले गुलाब घेऊन...

माझ्या पाऊलखुणा मिटवित

मागे वळून न पाहता...

पेटत्या मशालीमागून...

...तू येशील का?

## जोवरी

जोवरी तुझिया स्मृतींचा गंध उरी वाहताहे
तोवरी श्वासात माझ्या प्राणप्रिये श्वास आहे

छेडीली तू अधर वीणा कानी माझ्या गूंजताहे
तेच माझ्या जीवनाचे गीत अन् संगीत आहे
जोवरी ह्या महफिलीची माझ्या मनी आरास आहे

गोड सहवासात अजूनी ऊन स्पर्शी धुंद मी
आणि एकांती बसूनी भोगी हा आनंद मी
जोवरी माझ्या सभोवती ह्या क्षणांचा पाश आहे

## नभातल्या निळाईची

नभातल्या निळाईची सखी तुला आण गं
चांदण्याचं हसु तुझ्या ओठांवर आण गं

चंदेरी भाळावर बट तुझी काळी
गोऱ्या गोऱ्या गालावर लाल लाल खळी
        फिरवू नको मान अशी सोडूनिया बाण गं!

केतकीचा रंग तुझा भरजरी साडी
धरू नको मनामध्ये भलतीच अढी
        यौवनाच्या सागराला आलंय उधान गं!

स्वर ऐकूनिया तुझा कोकीळाही लाजे
चालताना बांधावर चाळ तुझा वाजे
        चालू नको चाल अशी पेटते हे रान गं!

## रात जळे

रात जळे रात जळे

कमलकळया फुलवूनी शांत हो निळे तळे

भृंग धवल कमलात, मन माझे तळमळे

रात जळे रात जळे

दूर सखी दूर..दूर काय करू ना कळे

मधुर शीतल चांदणे आग लावूनी जळे

रात जळे रात जळे

सांवरूनी पाहतसे वस्त्र हे निळे निळे

चांदण्यात चंद्रमुखी? लागले मला खुळे

रात जळे रात जळे

उलुनी केवड्यातूनी धुंद गंध दरवळे

आठवण मनी तुझी नागिण जणू सळसळे

रात जळे रात जळे

## स्वप्न

स्वप्नी येऊनिया माझ्या कां राहिलीस तू स्तब्ध
कां न ओठातून तुझ्या एक उमटला शब्द
काय मनीषा घेऊनी आली होतीस तू सांग
कां तू खुलवूनी गेली माझ्या मनात ही सांज
होते चमकत तुझ्या आंसवे गं पापण्यात
गुलाबाच्या पाकळयांचे रंग होते गं गालात
भिडवीता नजर मी तुझ्या नयनास निळया
ओठांवर गं फुलल्या कर्दळीच्या लाल कळया
सांग लावू काय आता तुझ्या हसण्याचा अर्थ
डोळयांमध्ये तुझिया होती आंसवे का व्यर्थ?
कुठे भेटशील आता तुला विचारू मी कसे
कशी येशील स्वप्नात झोप डोळयावर नसे

## वसुंधरेच्या वीणेवरती

वसुंधरेच्या वीणेवरती जुळल्या श्रावण तारा
कळीकळीतून राग विलसले वाजे पैंजण वारा

आज धरेचे यौवन फुलले
या मातीतून गंध उमलले
अधीर धरेने घननिळाला केले कसा इशारा

पितांबरावर मोती झरती
इंद्रधनुचा मंडप वरती
वृक्षवल्लरी नर्तन करीती फुलवूनी पर्ण पिसारा

## मन मानेना

मन मानेना मानेना तुजविण सूर लागेना
क्षण क्षण बने युग युग ना सांगू किती या नयना

छुम छननन् वाजे वारा
झुम झननन् आल्या धारा
झणझणले अंबर हे तूच छेडिली ही वीणा?

सखी तुझ्या या नाचतात
सजल कुंभ शिरी हातात
बेचैन होऊन तुला शोधितसे राना वना

वैशाखी रखरखल्या
श्रावणधारा श्रवल्या
तुजविण श्रावण वणवा पेटवी या तन मना!

## आज कसे?

आज कसे ऊर भरूनी आले आली कशी ही याद
उमलुनी गेल्या लाख वेदना आली कोठून साद

मला वाटले विसरूनी गेलो फुला कळयांची बहार
जखम उकलुनी ह्या काट्यांनी चाळविले निखार
हृदय कुणाजवळ करू मी खुले न् मनमुराद

कशास आणि कोणाखातर जीवन जगतो म्हणून
मनात येता लाख प्रश्न हे आले नयन भरून
उमटूनी गेले बेचैनीचे रित्या मनी पडसाद!

**अर्थ**

बहार घेऊनी जीवनी माझ्या
निरागस बाले सम तू आली
कणखर या मग दगडामधुनी
मोर पालवी उमलून गेली

जीवनास मग रंग लाभले
इंद्रधनुच्या रंगामधुनी
कवच फोडूनी जुने काजळी
फुले उमलली खडक दुभंगूनी

पुष्पपरागाहूनही नाजूक
जोडून दिधले तू हे धागे
दुनियेचे मग भानच नुरले
मी नच पाहिन आता मागे

परीकथेतील राजकुमारा
परी मी निर्भिड होईन आता
जिंकून नेईन नगरीस माझ्या
बंद करो मग राक्षस वाटा

## पिसारा

तुझ्या स्मृतींचा पिसारा
जेव्हा मनात हिंदोळे
लाख लाख वेदनेचे
त्यास फुटतात डोळे
पदलालित्य ते त्याचे
जेव्हा होते मग सुरू
वीज पेटूनिया आत
सरी लागतात झरू
कल्पनेच्या कलशात
पाहूनिया मृगजळ
मनमोर माझा होई
किती व्याकूळ व्याकूळ

## चैत्राचा महिना आला

चैत्राचा महिना आला
आली कोकिळा माहेरी
कूहूँ कूहूँ करी हर्षाने
आंब्याच्या झाडावरी

मोरपंखी नयनांच्या पोरी
नाचती टिपऱ्यांच्या तालावरी
चैत्राची पालवी फुटली
फांद्या फांद्यांवरी

मने आनंदूनी गेली
आई बाबांच्या घरी
हृदयी शंकरा घेऊन
गौरी आली गं माहेरी

## उन सावली

उन सावली सावली
उब शितळ शितळी
कुठे वाळला पाचोळा
कुठे हिरवी पालवी

चढणीच्या वळणावर
स्पर्शे झुळूक कोवळी
मना आल्हादून जाई
जादू ही उषःकाली

मिळे प्रसाद आल्हाद
गार वाऱ्याच्या ओंजळीत
भय ग्रीष्माचे न उरे
असता शिदोरी असली

## दुःख माझे

दुःख माझे सुकुमार

सुरभीत सुमांपरी

फुलपाखरे नेतील

अलगद पंखावरी

दुःख माझे अलवार

प्रभातीच्या दवापरी

अरूण तो चुंबीत नेईल

मृदुलशा बिंबाधरी

दुःख माझे चांदण्याचे

झिरपते शशी करी

नेईल तो हळुवार

संपताना शर्वरी

दुःख माझे खोल खोल

अनंत आकाशा परी

स्वर्गंगेत पाझरेल

पर्जन्याच्या धारे परी

**जला रे**

रंग रूप ना तुला जला रे
तुला आदि ना अंत
तुझ्यात सारे वास करी रे
सकल ब्रम्हांड अनंत

अखिल रसात अमृतातही
सबल वीर्य तू तेज ज्वलंत
तू समस्त विश्वाचे बीज
सर्व व्यापी प्रलयंकर संथ

आपो मूल हि सर्वस्य सर्वमप्सु प्रतिष्ठितम्।।
आपोSमृतरसो यापः शुक्रमापो बलं महः।।
सर्वस्य बीजमापो वै सर्वमप्सु प्रतिष्ठितम्।।

-बृहद्पराशरस्मृति

महाभारत, खंड १ला पृ. ३४६

**भास्करा**

उषःकाली केशरी भास्करा
    प्रभातकाली उजळशी दिशा
पराहृण काली तळपत राहृशी
    उधळीत उष्ण प्रकाशा

संध्या समयी क्षितिजावरती
    रंग उधळीशी कुंकुमसा
नक्षत्रांचे दिवे लावीत
    येते चंद्रिका आकाशा

## ससा

ससा ससा ससा रे ससा
चांदोबाच्या मांडीवरती जाऊन तू
बसलास कसा ।।धृ।।

डोळे लुकलुक करूनी तारका
चोरून तुला बघतात कशा
ससा ससा ससा रे ससा।।१।।

चैत्र असो वा वैशाख तसा
चांदण्यात तू नहातोस कसा
ससा ससा ससा रे ससा।।२।।

शशांक म्हणती चांदोबाला
कुशीत त्याच्या म्हणून ससा
ससा ससा ससा रे ससा।।३।।

## I Wandered Lonely as a Cloud

I wandered lonely as  a cloud
That floats on high o’er vales and hills,
When all at once I saw a crowd,
A host, of golden daffodils;
Beside the lake, beneath the trees,
Fluttering and dancing in the breeze.

Continuous as the stars that shine
And twinkle on the milky way,
They stretched in never-ending line.
Along the margin of a bay:
Ten thousand saw I at a glance,
Tossing their heads in sprightly dance.

The waves beside them danced; but they

Out-did the sparkling waves in glee:

A poet could not but be gay,

In such a jocund company:

I gazed—and gazed- but little thought

What wealth the show to be had brought:

For oft, when on my couch I lie

In vacant or in pensive mood,

They flash upon that inward eye

Which is the bliss of solitude;

And then my heart with pleasure fills,

And dances with the daffodils/

William Wordsworth (1807)

## मी विहरत होतो एकाकी मेघापरी

मी विहरत होतो एकाकी मेघापरी
जो उंच उंच तरंगी गिरीदरी,
तेधवा अचानक गेली नजर थव्यावरी,
समुह, गोकर्णीचा सोनेरी,
तळ्यासमीप तरूतळी,
फडकत नाचत मंद झुळुकेवरी,

अविरत चमकत्या तारकासम
आणिक आकाशगंगेवरी लुकलुकत,
पंक्तीत अनंत पसरले ते
खाडीत अनुमार्गापर्यंतः
दशसहस्त्र दृग्गोचर निमिषात,
शिरे डोलवित आनंदाने होती नाचत.

नाचत होत्या जललहरी समीप, पण त्या
चमकत्या प्रमुदित लाटांवरही त्यांनी केली मातः

कवीही होऊ शकला उल्हसित,

त्या हर्षभरीत सवंगड्यांच्या सहवासातः

एकटक बघता सुक्ष्म विचार मनी आला

ह्या दृष्याने कोणता ठेवा आणिला मजप्रतः

अनेकदा जेधवा पहुडतो मंचकी

शून्यमनस्क किंवा चिंताक्रांत होत,

तेधवा पडतो लख्ख प्रकाश अंतःचक्षूत

ते एकांतातील परमसुख अनुभवीत;

आणिक तेधवा मम हृदय होतसे ओतप्रोत प्रमुदित,

आणिक राहते करीत नृत्य गोकर्णीच्या फुलासमवेत.

विल्यम वर्डस्वर्थच्या ‘आय वॉन्डर लोन्ली ऍज ए क्लाऊड’ ह्या कवितेचा अनुवाद
११-४-२०१५

## प्रदीर्घ कुंभक

चालेना ढग आकाशातील
        हाले न तरूचे पान
निश्चल सारा आसमंत
        न कानावर येई सुमधुर गान

संसृतीचा उष्मा न सोसवे
        लावून बसलो ध्यान
तरी न येतसे मंदानिल तो
        घेऊन शितल तान

सृष्टीही करते प्रदीर्घ कुंभक
        तोल राखण्या समान
सृष्टीचे हे रहस्य जाणूनी
        करू तिचा सन्मान

२१-०५-२०१५

**जारे जारे पावसा**

जारे जारे पावसा
तुला देईन पैसा
पैसा खरा होईना
पाऊस कसा जाईना

पावसा येरे शेतावरती
बरसू नको घरांवरती
घरांवरती बरसला तर
पाणीच पाणी शहरभर

शेतावरती बरसला तर
पिके वाढतील भराभर
हिरवे हिरवे होईल सारे
पिकास येतील मोत्याचे तुरे

सोन्याची मग होईल शेती
पैसा होईल खराखुरा
आनंदाला येईल पूर
दारिद्र्य मग होईल दूर

## आली खिडकीत माझ्या

आली खिडकीत माझ्या
        कबुतरांची जोडी
दोघे होते काढीत
        परस्परांची खोडी

मोरपंखी माना
        होते वेळावीत
केशरी पावलांचे
        पदलालित्य करीत

चंचूंवर चंचू घासून
        करीत गुटर् घूँचा ध्वनी
आल्या धावतच साऱ्या
        तुझ्या स्मृती माझ्या मनी

## चल आपण होऊ

चल आपण होऊ फुलपाखरू
दोघेही फुलबागेमध्ये फिरू
नकोच व्हाया फुलपाखरू
पोरं धरून लागतील कुस्करू

चल मग आपण होऊ पक्षी
निळ्या अंबरी काढू नक्षी
पक्षी व्हायला नकोच ना
शिकार करील तो ससाणा

मग होऊया सुंदरशी हरणं
पळत बागडत पाहू हिरवी वनं
नकोच व्हाया हरणे जावूनी वनात
दिसता व्याधाला करील क्षणातच घात

मग होऊया मासोळी पोहूया पाण्यात
लाटांवर होऊनी स्वार मौज फिरण्यात
मग राहिल कुणाची भीती कशाला
गळ कोळ्याचा अडकेल ना घशाला

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहेकडे लक्ष नका देऊ. रडणाऱ्यां . एका आवृत्तीच्या हजार मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या .दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं . वर्षालाअर्धाकोटी डाऊनलोड होतातवाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप ., ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीतसुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासू .न ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात.रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही .

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हाआपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात . ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवातुम्ही फ़क्त दहा व .ाचक आणाते . शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. यची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवा जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवाकिंवा .7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.